# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा - २०१६

**अधिसूचना क्रमांक :एएसएम-०३१६/सीआर -६१/२०१६/तीन** **जाहिरात क्रमांक :-४९/२०१६**

जाहिरात क्रमांक २५/२०१६, दिनांक २९ एप्रिल, २०१६ नुसार राज्य शासनाच्या मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयातील एकूण ४३ पदांच्या भरतीकरीता आयोगामार्फत **रविवार**, **दिनांक ३१ जुलै, २०१६** रोजी घेण्यात आलेल्या सहायक कक्ष अधिकारी पूर्व परीक्षा - २०१६ च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा - २०१६ रविवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१६ रोजी फक्त मुंबई** येथे घेण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| **सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ३५ + ८ # = ४३ पदे)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| पदसंख्या | ३ | ४+१* | २ | १+१* | -- | १ | ७ | २ | २२ | २१ | ४३ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | २ | २+१ # | १ | १+१ # | -- | १ | ४+१ # | १+१ # | १२+४ # | १२+२ # | २४+६ # |
| (२) महिला | १ | १+१ # | १ | -- | - | -- | २ | -- | ५+१ # | ५+१ # | १०+२ # |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (४) विकलांग | श्रवण शक्तीतील दोष - १ # पद | | | | | | | | | | |
| | * अनुशेषाची पदे. # महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील पदे | | | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिलांसाठीचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.३** महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत, महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छित असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेयर मध्ये मोडत असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**२.४** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**२.५** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२.६** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे ते ज्या संवर्गासाठी अर्ज करीत आहेत, त्याकरीता विहित दर्जाची असल्याबाबत अर्ज सादर करताच सक्षम प्राधिका-याकडून खातरजमा करुन घ्यावी. तरच त्यांना गुणवत्ताधारक पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल.

**२.७** प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मूळ प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी सक्षम प्राधिका-यांकडून आमंत्रित केल्यानंतर प्रमाणपत्राच्या तपासणीकरीता येण्यापूर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे किंवा सक्षम प्राधिकारी यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

**२.८** संचालक, क्रीडा किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी** सादर करणे आवश्यक आहे.

**२.९** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक कअस १३१५/प्र.क्र.१२०/१४ब, दिनांक १६ एप्रिल, २०१६ नुसार अंधत्व किंवा क्षीणदृष्टी, श्रवणशक्तीतील दोष व चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू या प्रकारच्या पात्रतेचे निकष धारण करणारे विकलांग उमेदवार गुणवत्तेनुसार शिफारशीसाठी पात्र असतील.

**२.१०** विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**२.११** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२.१२** मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्रमांक २०५३/२०१४ प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तुत प्रकरणी पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

२.१३ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

२.१४ विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत यासंदर्भात संबंधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्रपणे पत्राद्वारे विनंती करणे आवश्यक आहे.

**३. वेतनश्रेणी :-** **रूपये ९,३००-३४८०० (ग्रेड पे-४,३००) अधिक नियमानुसार भत्ते.**

**४. पात्रता :-**

**४.१. भारतीय नागरिकत्व.**

**४.२ वयोमर्यादा :-**

**४.२.१** दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी वय किमान १८ वर्षे असावे व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

(२) प्राविण्य प्राप्त खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

(३) माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम.

(४) विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-**

**४.३.१** सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

**४.३.२** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र होते. परंतु सहायक कक्ष अधिकारी **मुख्य परीक्षा- २०१६ च्या प्रवेशासाठी** पात्र ठरणा-या उमेदवारांनी सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा- २०१६ करिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**४.३.३** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

**४.३.४** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**५. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**५.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**५.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**५.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**५.२** प्रमाणपत्रे तपासणीकरीता आमंत्रित केल्यानंतर पात्रतेसंदर्भातील सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे तपासणीच्या वेळी सादर न केल्यास शिफारशीसाठी विचार करण्यात येणार नाही.

**६. शुल्क** : **६.१** :- अमागास - **रुपये ५२३/-** **६.२** :- मागासवर्गीय - **रुपये ३२३/-**

**७. परीक्षेचे टप्पे - एक**

(१) लेखी परीक्षा - २०० गुण (२) लेखी परीक्षेमधील एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

**८. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**८.१** सहायक कक्ष अधिकारी पूर्व परीक्षा - २०१६ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची **दिनांक २१ ऑक्टोबर , २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमदेवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**८.२** पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत नव्हते परंतु **दिनांक २१ ऑक्टोबर , २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमदेवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**८.३** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्दारे फक्त ऑनलाईन पध्दतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक राहील.

**८.४** पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जादवारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता आवश्यक अर्ज/माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

**९. अर्ज करण्याची पध्दत :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज/माहिती फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येईल.

**९.२** पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज/माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करणे व आयोगास अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

९.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

९.६ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतली जाणार नाही.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

९.७.१ शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

९.७.२ "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर "माझे ॲप्लीकेशन" सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे.

९.७.३ 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेली असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

९.७.४ " Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील. **(अ)** ऑनलाईन पेमेंट **(ब)** नागरी सुविधा केंद्र **(क)** चलनाव्दारे

९.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

९.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

९.७.७ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

९.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज/माहिती सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज/माहिती सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

९.७.९ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

९.७.१० चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

९.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९.८ **विभागांचा पसंतीक्रम** : -

९.८.१ प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या एकूण ४३ पदांपैकी ३५ पदे शासनाच्या मंत्रालयीन विभागाची असून ८ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील आहेत.

९.८.२ अर्ज सादर करतानाच प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांकरीता विभागांचा पसंतीक्रम ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.

९.८.३ विभागांचा पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी खालील अटींवर देण्यात येईल :-

(१) पसंतीक्रम फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतानाच व आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(३) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीने व कालावधीत पसंतीक्रम सादर न केल्यास प्रथम पसंतीक्रम मंत्रालयीन विभाग व द्वितीय पसंतीक्रम आयोगाचे कार्यालय असा पसंतीक्रम असल्याचे समजण्यात येईल व त्यामध्ये बदलाची संधी दिली जाणार नाही.

९.८.४ चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरण्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी पसंतीक्रम निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस सार्वजनिक सुट्टीचा असेल तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

**१०. प्रवेशप्रमाणपत्र**

१०.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवरील उमेदवारांच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ परीक्षेच्यावेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०.३ परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**११. परीक्षेस प्रवेश**

**११.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

११.२ डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे, असे साहित्य आणल्यास त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

११.३ आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/ महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

१२. प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज/माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा**" विभागातील '**सहायक कक्ष अधिकारी परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१३.** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
**१४.** परीक्षेची अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ७ ऑक्टोबर , २०१६

सु. ह. अवताडे
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.